अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । रविवार, दि. २३ जून २०२४ । वर्ष : २२ वे अंक : २६४ वा किंमत : ५ रुपये पाने १२

## भारताचा सेमीफायनलमध्ये प्रवेश, हार्दिक पंड्या सामनावीर


**● बांगलादेशचा ५० धावांनी धुव्वा!**



**अँटीग्वा :** बांगलादेशचा ५० धावांनी धुव्वा उडवत टीम इंडियाने उपांत्य फेरीचं तिकिट निश्चित केलेय. लागोपाठ दोन पराभवानंतर बांगलादेशचं विश्वचषकातील आव्हान संपुष्टात आलेय. बांगालदेशला आधी ऑस्ट्रेलियाने आणि आता भारताने हरवले, त्यामुळे त्यांचं स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आलेय.

सुपर ८ मध्ये भारताने लागोपाठ दोन सामन्यात विजय मिळवलाय. अफगाणिस्तान आणि बांगलादेशचा पराभव करत भारताने उपांत्य फेरीत धडक मारली आहे. अखेरचा सामना ऑस्ट्रेलियाविरोधात होणार आहे. सांघिक खेळाच्या जोरावर भारताने बांगलादेशचा ५० धावांनी पराभव केला. हार्दिक पांड्या, ऋषभ पंत, विराट कोहली, जसप्रती बुमराह आणि शिवम दुबे यांनी शानदार खेळी केली. हार्दिक पांड्याने अष्टपैलू खेळी करत विजयात सिंहाचा वाटा उचलाल. हार्दिक पांड्याला सामनावीर पुरस्काराने गौरवण्यात आले. हार्दिक पांड्याने फलंदाजी करताना अर्धशतक ठोकले, त्यानंतर गोलंदाजीवेळी महत्वाची विकेट घेतली. जसप्रीत बुमराहचा भेदक मारा आणि कुलदीप यादवच्या फिरकीच्या जाळ्यात बांगलादेशचे फलंदाज अडकले. जसप्रीत बुमराहने ४ षटकात फक्त १३ धावा खर्च करत दोन फलंदाजांना माघारी धाडले. तर कुलदीप यादवने चार षटकात १९ धावा खर्च करत तीन फलंदाजांची शिकार केली. हार्दिक पांड्याने एक विकेट घेतली.

# पाकणीत २०० वर्षांपासून मजल्यासाठी चढेना वीट





**विष्णू सुरवसे/उत्तर सोलापूर**

**उत्तर सोलापूर तालुक्यातील मोठं अन् श्रीमंत गावं म्हणजे पाकणी. चांगली समृद्धता असलेल्या या गावामधील घरं म्हटलं तर एकमजली. कोणी कितीही लखपती, कोट्याधीश असला तरी त्यांचं घर हे तुम्हाला अनेक मजली दिसणारच नाही. इथं उभारली गेलेली अत्यंत देखणी घरं पण तळमजल्याचीच. घरांबद्दलची या गावची गोष्टच तशी न्यारी आहे. तब्बल २०० वर्षांपासून या गावात दुमजली-तीन मजली घरांसाठी वीटच चढवली जात नाही. अनेक मजली घरं न उभारण्याची या गावात जणू आता परंपराच झाली आहे. जी परंपरा मागच्या साधारण २०० वर्षांचीपासूनची. कैक पिढ्यांनपासूनची ते थेट आत्ताच्या नव्या पिढीपर्यंतची.**

## ● गावात दोन-तीन मजली घरे बांधण्यास कोणीच धजावेना

- मंदिराच्या शिखरापेक्षा उंच घरे बांधल्यास नृरसिंह महाराज कोपतात याची पिढ्यान पिढ्या भिती कायमच
- विज्ञान-तंत्रज्ञान अन् ॲपच्या जगतात वावरणारी नवी पिढीदेखील भितीमुळं स्विकारेना बदल
- उंच टोलेजंग बंगल्यात राहण्याची इच्छा असूनही लखपती-कोट्यधीशदेखील राहतात तळमजल्याच्या घरांमध्येच





विशेष म्हणजे विज्ञान-तंत्रानाच्या युगात अन् ॲपच्या जगतात वावरणाऱ्या नव्या पिढींनंदेखील अनेक मजली घरं न बांधण्याची इथली परंपरा तशीच जपली. सुख, वैभव अन् समृद्धता नांदणाऱ्या या गावात खरं तर टोलेजंग इमारती दिसायल्या हव्या होत्या.

अनेकांच्या गर्भश्रीमंतीचं प्रतिबिंब हे अनेक मजली टॉप बंगल्यामध्ये दिसायला हवं होतं. मात्र तसं इथं होत नाही. या गावातलं घरासंबंधींचं वास्तव आहे ते पूर्णपणे वेगळं. खरं तर इथं अनेक मजली टोलेजंग बंगले उभारण्याचं धाडसच कोणी करायला तयार नाही. धाडस न करण्याचं कारणदेखील तसंच सांगितलं जातं.

सीना नदीकाठी वसलेल्या या गावाचं जागृत ग्रामदैवत श्री नृरसिंह आहे. या ग्रामदैवताचं मोठं मंदिर या गावात आहे. या मंदिराच्या कळसाच्या उंचीपेक्षा कोणाच्या घराची बांधकामाची वीट वरती गेल्यास म्हणजे मंदिराच्या उंचीपेक्षा घराची उंची जादा झाल्यास संबंधित घर बांधणाऱ्यांचे मोठे नुकसान होते. श्री नृरसिंहाला आपल्या मंदिरापेक्षा कोणाच्या घराची उंची जास्त झालेली चालत नाही, तसे झाल्यास श्री नृरसिंह त्याचा काटा काढतात. श्री नृरसिंह महाराज कोपतात. असं घर बांधणाऱ्या संबंधिताचं सगळं काही उद्धवस्त करतात अशी साधारण २०० वर्षांची आख्यायिका म्हणजे अनेक मजली घर बांधण्यासंदर्भात या गावात भितीचे सावट आहे. या भितीपोटी श्री नृरसिंह मंदिराच्या उंचीपेक्षा जादा उंचीचं घर बांधण्यास कोणीच आजवर धजावत नाही.

### ● म्हणे नृसिंह महाराज कोपतात... अलिशान बंगल्यात राहण्याच्या इच्छेवर फिरतं पाणी..!

उत्तर तालुक्यातील पाकणी हे गाव,सीना नदी काठावर वसलेलं. गावचे वार्षिक उत्पन्न कोटीच्या वर.साधारण १० हजार लोकसंख्या असलेले गाव. प्राथमिक, माध्यमिक तसेच आश्रम शाळा, दवाखाने, तलाठी कार्यालय,पशु वैद्यकीय दवाखाना इतर. केंद्र सरकारच्या तीन पेट्रोलियम कंपनीमध्ये इंधनाची साठवणूक व वितरण असल्यामुळे कोटयवधी रुपयांची उलाढाल आहे. मोठं बागायत क्षेत्र आहे, वार्षिक लाखो रुपयांची कमाई होत असताना आज ही येथील ग्रामस्थ फक्त तळमजला घर बांधूनच राहतात. कोणाला वाटत नाही, आपल्या कमाईत अलिशान आलिशान बंगला बांधवा. कोणाला नको आहे तीन चार मजली अप्रितम देखणी इमारत? इच्छा असूनही का बांधत नाहीत दुमजली बंगला, टोलेजंग इमारत तर म्हणे नृसिंह महाराज कोपतात.

### ● अघटरीत घडण्याच्या भितीचं सावट दूर होईना परंपरा खंडित करुन उंच घर बांधण्याचं धाडस कोणी करेना

ग्रामदैवत श्री नृरसिंह महाराजांना त्यांच्या मंदिराच्या कळसापेक्षा जादा उंचीचं घर कोणी बांधलेलं चालत नाही. तरीही कोणी धाडस केल्यास महाराज कोपतात. भयानक अघटित घटना घरात घडतात अशी साधारण दोनशे वर्षांपासून या गावात असलेली भिती आजही जात नाही. तळमजल्याचं घर बांधूण गुण्यागोविदानं राहिलेलं बरं. पण टोलेजंग इमारत नको, ही मानसिकता या गावच्या नव्या पिढीचीदेखील आहे. २०० वर्षांपासूनची परंपरा नव्या पिढीनं भितीच्या सावटाखाली स्विकारली आहे.

### ● उंच घरे न बांधण्याबद्दल सांगितली जाते 'ही' आख्यायिका

पुजारी महेश कुलकर्णी यांनी सांगितले की, पश्चिम दिशेला पूर्वेकडे तोंड असलेल्या श्री नृसिंह जागृत देवस्थानची स्थापना त्यांचे पणजोबा परशुराम रावजी कुलकर्णी यांनी दोनशे वर्षांपूर्वी केली. या देवस्थानचे मुळ नीरा नरसिंह पूर येथे असून गाईच्या नखामध्ये तांदळाच्या आकाराची मूर्ती असून तेंव्हा पासून ते आज पर्यंत कुलकर्णी घराण्याकडेच मंदिराचे पुजारीपण आहे. कथित आख्यायिका अशी आहे की, गावाच्या हद्दीत जो कोणी दोन मजली घर,बंगला बांधला की त्यांच्या घरात वाईट घटना घडते, फार मोठे आर्थिक नुकसान होते,घर संपुष्टात येते, अशी आख्यायिका पिढ्यानपिढ्या सांगत आली गेली. मंदिरापेक्षा अधिक उंचीचं घर बांधलं जाऊ नये, अशी भिती घालण्यात आली, त्यामुळे गाव हद्दीत श्री नृसिंह मंदिरापेक्षा मोठ्या उंचीचं घर बांधण्याचे कोणी धाडस करीत नाही.

> मी श्री नृरसिंह मंदिर परिसरात जवळपास ५० वर्ष होत आले येथे राहतो आहे. माझा व्यवसाय शेती असून बागायती आहे. पैसा येतो आणि जातो दोन मजली घर बांधावे वाटते पण भिती वाटते.
>
> **- महादेव शिंदे,** बागायतदार, पाकणी, ता. उत्तर सोलापूर

> पाकणीच्या श्री नृरसिंह मंदिराच्या ५ ते ६ कि.मी.च्या परिसरात कुठेही दोन मजली घर दिसणार नाही याचे कारण म्हणजे लोक म्हणतात त्याप्रमाणे कळसाच्या बरोबरीने कोणी घर बांधले तर अघटित घटना घडते.अचानकपणे घरातील कोणाचा तरी मृत्यू होतो. आर्थिक संकट कोसळते म्हणून कळसाच्या उंची बरोबर घर बांधत नाहीत.
>
> **- नागनाथ यलगुंडे,** ग्रामस्थ, पाकणी, ता. उत्तर सोलापूर

> पाकणी गावात मी ७० ते ८० वर्षांपासून राहात आहे.गावात कोणीही अनेक मजली घर बंधू शकत नाही.असे घर बांधल्यास सर्वनाश होतो. या सर्वनाशाला घराचा मालक जबाबदार राहतो.
>
> **-अशोक शिंदे,** ग्रामस्थ, पाकणी, ता. उत्तर सोलापूर

> पाकणी गावाचा कोणी राहणारा असेल किंवा बाहेर गावचा कोणी येथे येऊन राहत असेल या गावात संबंधितानं दोन मजली किंवा त्यापेक्षा अधिक मजल्याचे घर बांधल्यास आजरी पडणे,आर्थिक नुकसान होणे,कौटुंबिक त्रास असे प्रकार होतात
>
> **- चतुराबाई साठे,** गृहिणी, पाकणी, ता. उत्तर सोलापूर

> मोठ्या उंचीची घरे बांधू नका असे वाड वडिलांनी सांगितले आहे. त्यांनी जे चांगल्या हितासाठी सांगितले आहे, त्यावर विश्वास ठेवावा लागतो.
>
> **- माधव आवताडे,** विद्यार्थी, पाकणी, ता. उत्तर सोलापूर

> काळ, आणि वेळ आल्यास त्यातून माणूस कधीही सुटू शकत नाही. ही घटना व म्हणणे पूर्णपणे थोतांड आहे. जे नशिबात आहे जे घडायचे आहे ते घडते. आता कित्येकजण आहेत, ज्यांनी परगावी उंच घरे बांधनी आहेत. उंच घरे न बांधण्याबद्दलची अंधश्रद्धा आहे. आख्यायिका थोतांड आहे.
>
> **- धनाजी गुंड,** समाजसेवक, अंनिस कार्यकर्ता शिवणी, ता. उत्तर सोलापूर

## मोटारीत झोपलेल्या ड्रायव्हरचा मृत्यू

**सोलापूर :** प्रवाशांना सोडून मोटारीत झोपलेला ड्रायव्हर मोटारीतच मृत अवस्थेत आढळून आला. ही घटना बालाजी सरोवर हॉटेलच्या पार्किंगमध्ये शनिवारी (दि.२२) उघडकीस आली. संदीप अनंत कोरगावकर (वय ४६ रा. खडपवाडा, गोवा) असे मृत ड्रायव्हरचे नाव आहे. तो प्रवासी घेऊन सोलापुरातील हॉटेल बालाजी सरोवर येथे आला होता. शुक्रवारी (दि.२१) रात्री तो आपल्या जीए०३-डब्ल्यू-९४९५ या इनोव्हा मोटारीत झोपला होता. शनिवारी तो मोटारीतच बेशुद्ध अवस्थेत आढळला. त्याला विजापूर नाक्याच्या पोलिसांनी रुग्णालयात दाखल केले असता तो मृत झाल्याचे आढळून आले.

## शेतजमिनीच्या कारणावरुन बन्नेंवर कोयत्याने खुनी हल्ला; प्रकृती गंभीर

**सोलापूर :** शेतीचा वाद न्यायप्रविष्ठ असताना राग मनात धरुन बाळे येथील गट नं. ४१/३ येथे ७६ आर शेतीचे मोजणी करण्याकामी भूमी अभिलेख विभागाचे कर्मचारी आले असता, विरोधी बाजूच्या सात ते आठ व्यक्तींनी पुरुषोत्तम बन्ने यांच्यावर कोयत्याने खुनी हल्ला चढविला. या हल्ल्यात पुरुषोत्तम बन्ने हे गंभीर जखमी झाले असून त्यांची प्रकृती गंभीर असून त्यांना खासगी रुगणालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

पोलिससुंत्राकाडून मिळालेली अधिक माहिती अशी की, पुरुषोत्तम दिगंबर बन्ने (वय ४८ वर्षे) यांचे नावे (बाळे, चोर लक्ष्मी जवळ मौजे बाळे ता. उत्तर सोलापूर) येथील गट नं. ४१/३ येथे ७६ आर शेती आहे. त्यांच्या शेती लगत शांतप्पा आडके राहणार देगांव यांची शेती आहे. शांतप्पा आडके याने शेतीमध्ये अतिक्रमण केले होते. त्या कारणा वरुन वाद चालू होता म्हणून त्याबाबत शांतप्पा आडके याने सोलापूर येथील दिवाणी न्यायालयात दावा दाखल केला होता. सदर शेत



जमीनीची शासकिय मोजणी आले असता त्यावेळी हा प्रकार घडला. पुरुषोत्तम हा गंभीर जखमी असल्याने त्यास सिध्देश्वर हॉस्पीटल येथे प्राथमिक उपचार घेवुन त्याची प्रकृती गंभीर असल्याने पुन्हा वळसंगकर हॉस्पीटल येथे ॲडमिट केले असुन त्याचेवर उपचार चालु आहेत.प्रकृती गंभीर असल्याचे पोलिससुत्रांकडून सांगण्यात येत आहे. या घटनेच्या बाबत फौजदार चावडी पोलिस स्टेशन मध्ये शांतप्पा आडके, सागर आडके, बाळु आडके सर्व राहणार (देगांव, ता. उत्तर सोलापूर) व त्यांचे सोबतचे अनोळखी इतर ७ ते ८ इसम यांचे विरुध्द तक्रार दिली. या घटनेचा तपास सपोनि गायकवाड करीत आहेत.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




नुसतेच वादळवारे नकोत !

कल्याण

247-31-146

# कणखर प्रा.डॉ.तानाजी सावंत भावनाविवश होऊन रडले; 'त्या' प्रसंगाचा व्हिडीओ मराठ्यांना चिंतनशील बनवणारा

## ● चिऊ देठे म्हणताहेत...'हे' तसं जाणारे नव्हेच नव्हते
## ● सर, हे बदलायला हवं; मराठा आरक्षण मिळायलाच हवं

**सोलापूर/खास प्रतिनिधी**

राज्याचे सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रा.डॉ. तानाजी सावंत हे तसं अगदी कणखर आणि तितकंच धडाकेबाज व्यक्तीमत्व. अत्यंत स्पष्टपणा हे त्यांच्या स्वभावाचं वैशिष्ट्ये. एक घाव अन् दोन तुकडे करुन विषय संपविणं ही त्यांची खासियत. पण अत्यंत कणखर मनाचा हाडामासाचा हा माणूस खरोखरच अक्षरश: रडला.

नामदार सावंतांनी डोळं गाळणं हे तसं म्हटलं तर साधंसुध नव्हतं आणि नाहींसुद्धा. ते ज्या एका अत्यंत भावनिक तसंच हृदयस्पर्शी प्रसंगातून गेले तो प्रसंगच मनाला चुटका लावणारा. भावनाविवश करणारा....मराठा समाजाला चिंतनशील करुन सोडणारा. प्रा.डॉ. सावंत आणि चिऊ देठे यांच्यासंबंधिचा सोशल मीडियावर व्हायरल झालेला हा व्हिडीओ पोटात आग पाडणारा. काही केल्या मराठा आरक्षण मिळेना म्हणून निराशेच्या गर्तेत गेलेल्या मुळच्या बार्शीच्या प्रसाद देठेंनी पुण्यात व्हिडीओ लाईव्ह करत आत्महत्या करुन आपलं आयुष्य संपवलं. ही गोष्ट संवदेनशिल मनाच्या प्रा.डॉ. सावंतांना कळल्यानंतर ते देठे कुंटुंबियाचं सात्वंवन करायला गेले



होते. मराठा आरक्षणासाठी बलिदान दिलेल्या प्रसाद देठे यांच्या परिवाराचा भयावह उन्हाळा झाला होता. देठे यांच्या पत्नी पती प्रसाद आणि मराठा आरक्षणाबद्दल सांगत होत्या. प्रसाद यांच्या मराठा समाजासाठी जाण्यानं पत्नी चिऊ मुलगा ओम, मुली श्रद्धा आणि सायली हे रस्त्यावर आले याचं दु:ख संवेदनशील मनाच्या प्रा. डॉ. सावंतांना झालं. देठे परिवाराचा कर्ताधर्ता प्रसाद यांनी जे टोकाचं पाऊल उचललं ते सावंताना खटकलं. आत्महत्या करण्याबद्दल त्यांनी प्रसाद यांना दोषच दिला. मराठ्यांच्या आरक्षणासाठी लढाई आता अंतीम टप्यात आली असताना देठे यांनी आत्महत्या करण्याची आणि परिणाम कुंटुंब येऊ देण्याची अविचाराने गोष्ट करायली नको होती हेच सावंतांनी सांगितलं.

### पाच लाखांची मदत; भविष्यातही सर्वोतोपरी मदतीचं अभिवचन

प्रसाद देठेंच्या आत्महत्यानंतर त्यांच्या परिवारावर जो दु:खाचा डोंगर कोसळला. कुंटुंब रस्त्यावर आलं. त्याला सावरण्यासाठी प्रा.डॉ. सावंतानी पाच लाखांचा धनादेश चिऊ देठे यांच्याकडे दिला. भाऊ म्हणून सहकार्य राहील. मुलांच्या शिक्षणाची काळजी करु नका, प्रसाद यांच्या विधीचे सोपस्कार होऊ द्या, आपण पुन्हा भेटूया असं अभिवचन सावंतांनी दिलं.

### प्रा.डॉ.सावंतांच्या वाणीतून

- प्रसाद देठे यांनी टोकाचं पाऊन उचलण्यानं परिवार रस्त्यावर आला
- आरक्षणाचा विषय शेवटच्या टप्यात आहे, देठेंनी आत्महत्या करणं हे चुकीचं झालं
- समाजासाठी बलिदान देऊन आपलं कुंटुंब रस्त्यावर आणनं हे कोणी सांगितलं
- कोण कोणाचं नसतं...कोणी कोणाला मदतीला, विचारायला येत नसतं.
- २०१७-१८ नंतर आरक्षणासाठी आत्महत्या केलेल्या ४० तरुणांच्या घरच्यांकडं गेलं का कोणी? केली का मदत कोणी?
- प्रसाद देठेंनी आत्महत्या केली, मात्र त्यांच्या या लेकरांचं काय?
- आरक्षणासाठी आत्महत्या करण्याचं निर्णयच अत्यंत अविचारी आणि संताप आणणारा आहे
- या लेकारांच्या भविष्य उघड्यावर टाकून जायचं किती अवघड आहे
- आत्महत्या केल्याची शिक्षा पती आणि मुलांनाच बसते ना

### चिऊ देठेंच्या वाणीतून...

- पती प्रसाद हे अविचारी नव्हते, आरक्षण मिळत नाही याचा आत्मविश्वास वाटलल्यानेच त्यांनी स्वत:ला संपवलं
- मराठा आरक्षणासंबंधी सर्वांनी आजवर आश्वासनेच दिली, आरक्षण मिळणार याचा भरोसा वाटेना
- आत्महत्येबद्दल माझ्या पतीला सगळे दोष देतील, वाईट केलं म्हणतील पण ते अविचारी नव्हतेच नव्हते
- माझ्या पतीनं मराठा समाजासाठी दिलेलं योगदान अत्यंत मोलाचं आहे
- अवघा तीन हजार रुपये पगार होता तरी ते आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांचा कुंटुंबियांना दोनशे दोनशे रुपयांची मदत करायचे
- पाय मोडल्यावर घरी असतानादेखील त्यांनी समाजकार्य चालूच ठेवलं होतं
- पती जाण्यानं भयानक परिस्थिती उद्भवली
- आमच्या जगण्यासह मुलांच्या शिक्षणाचं काय करायचं हा प्रश्न आहे.
- प्रा. सावंत सर मराठा आरक्षण मिळायलाच हवं, सगळं बदलयाला हवं
- माझे पती लढून लढून हताश झाले होते
- पतींनं २०१० पासून समाजासाठीच काम केलं.
- आत्महत्या करणं हे चुकीचं हे माझ्या पतीला जाणवलं पण त्यांचा नाईलाज झाला